# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १७६-२३** **दिनांक ०२/०६/२०२३**

## गावठी हातभट्टीची दारु तयार करणा-या अड्ड्यावर गुन्हे शाखा कक्ष -३, विरार पथकाची कारवाई.

-------00000-------

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात अवैद्य धंदयावर प्रभावीपणे कारवाई करुन पायबंद करणे बाबत. वरिष्ठांनी सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष ३, विरार यांना दिनांक ०२/०६/२०२३ रोजी ०५.०० वा. चे सुमारास गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, विरार पुर्व, वासु पाटील यांचे शेतात, पापडखिंडी, देवीपाडा येथे बेकायदेशीर रित्या गावठी हातभट्टी दारु तयार होत आहे. मिळालेल्या माहितीचे अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष ३, विरारचे अधिकारी व अंमलदार यांनी वर नमुद ठिकाणी छापा कारवाई करुन १) ॲल्युमिनीयम धातुचे थाळीचा टाव , नळी असलेले चाटु २) २०० लिटर क्षमतेचे १० निळया रंगाचे प्लाटीचे ड्रम तसेच २० लिटर क्षमचेचे सफेद रंगाचे १० प्लास्टीकचे कॅन त्यात एकूण २२०० लिटर नवसागर गुळ मिश्रीत वॉश ३) २० लिटर क्षमतेचे २ सफेद रंगाचे प्लास्टीकचे कॅन त्यात २० लिटर गैरकायदा गावठी हातभट्टीची दारु असा एकुण ०१,०९,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला असुन इसम नामे शांताराम रघुनाथ गांगडे, रा. चिंबीपाडा, तिल्हेर रोड, ता. भिवंडी, जि ठाणे याचे विरुध्द पो.अंम. सुनील बाळासो पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादी वरुन विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नंबर ५३१/ २०२३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ब) (क) (ड) (फ) (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ३, विरारचे पो.नि. श्री. प्रमोद बडाख, पो.उप.नि. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, सचिन घेरे, सागर बारावकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अंम. राकेश पवार, सुमित जाधव, म.सु.ब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव यांनी केली आहे.

-----



------ooo------